Movie: Galli Te Dilli
Year: 1982

Song: Mee Amuk Hay Mee Tamuk Hay
Lyricist:

मी अमुक हाय
मी तमुक हाय मी
कशाला सांगता जंत्री
मी अमुक हाय
मी तमुक हाय मी
कशाला सांगता जंत्री
अहो दीडदमडीचा रूबाब तुमचा
मंत्री म्हणू का संत्री
अहो दीडदमडीचा रूबाब तुमचा
मंत्री म्हणू का संत्री
नाक उडवूनी बोलू नको गं
कुणी नं माझ्या जोडीला गं...
आगं नाक उडवूनी बोलू नको गं
कुणी नं माझ्या जोडीला गं...
आनं महादेवाच्या देवळामंदी
पहिला नमस्कार नंदीला
महादेवाच्या देवळामंदी
पहिला नमस्कार नंदीला
येवढं मातूर पटलं बरं का
नंदी बैल तू नावाचा
येवढं मातूर पटलं बरं का
नंदी बैल तू नावाचा
फुकट खातो इकात बोलतो
बोंबल भटक्या गावाचा
फुकट खातो इकात बोलतो
बोंबल भटक्या गावाचा
गरीबीची ही निंदा म्हणू का
शिरमंतीची थट्टा गं
गरीबीची ही निंदा म्हणू का
शिरमंतीची थट्टा गं
बारा गावामधी डंका माझा
कुळाला लावशील बट्टा गं
आगं बारा गावामधी डंका माझा
कुळाला लावशील बट्टा गं

किंमत कसली नव्हऱ्याची आन
हिंमत कसली नव्हऱ्याची
किंमत कसली नव्हऱ्याची आन
हिंमत कसली नव्हऱ्याची
कर्ज फिटंना म्हणून
करतोयं उसनवारी साऱ्याची
कर्ज फिटंना म्हणून
करतोयं उसनवारी साऱ्याची
आगं पत असतीया त्याला
मिळतीया कर्जदारीची देणगी
पत असतीया त्याला
मिळतीया कर्जदारीची देणगी
देणकऱ्याच्या हप्त्यानं मी
अब्रूची भरली कणगी गं
देणकऱ्याच्या हप्त्यानं मी
अब्रूची भरली कणगी गं
टीचभर खोली इतभर संसार
बसाया पटकुरं पोत्याचं
टीचभर खोली इतभर संसार
बसाया पटकुरं पोत्याचं
आंगणात खाटलं ते बी फाटलं
रूप घराला गोठयाचं
आंगणात खाटलं ते बी फाटलं

रूप घराला गोठयाचं
तुझ्यासाठी मी गल्ली ते दिल्ली
हेलपाटं घालतोय रात्री गं
आनं तुझ्यासाठी मी गल्ली ते दिल्ली
हेलपाटं घालतोय रात्री गं

गं ... घालतोय
आरं दीडदमडीचा रूबाब तुमचा
मंत्री म्हणू का संत्री रं
दीडदमडीचा रूबाब तुमचा
मंत्री म्हणू का संत्री रं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*